# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/02/2024 (शुक्रवार) दुपार

---

### चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील नगरधन शेत शिवार येथे दिनांक ३१/०१/२०२४ चे १९.३० वा. ते दिनांक ०१/०२/२०२४ चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— अरुन ताराचंद दमाहे वय ५३ वर्ष रा. नगरधन ता. रामटेक याने ठेक्याने केलेल्या शेतामधील तुरीचे पिक थ्रेशर मशीनने काढुन तुरीचे प्रत्येकी ६० किलो प्रमाणे १० कट्टे हे शेतामध्येच झाकुन ठेवले असता झाकुन ठेवलेल्या तुरीच्या १० कट्यापैकी ०४ कट्टे तेथे दिसुन आले व ०६ कट्टे तुरीचे प्रत्येकी ६० किलो प्रमाणे एकुण ०६ कट्टे किंमती ३०,०००/— रु चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस नायक गोपाल डोकरमारे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक गोपाल डोकरमारे मो. नं. ९७६४२८५९८८ हे करीत आहे.

### फसवणूक

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे दिनांक ०६/०२/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नितिन पदमाकर भांडारकर, वय ५६ वर्ष, अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य हे अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र येथे निरीक्षक या पदावर असून यातील **आरोपी नामे— श्री. हेमंत धोंडीबा मुळे, रा. लातूर २) श्री. मिहीर त्रिवेदी रा. भिवंडी ३) श्री. विजय शैलेंद्र चौधरी रा. ठाणे** यांनी संगणमत करून बनावट औषधीची खरेदी केली असून बनावट औषधीची सेवन केल्याने मानवी आरोग्यास धोखा निर्माण होवू शकतो तसेच सदरचे औषधी बनावट असून खर्रा म्हणून जनतेची व रूग्णांची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपींविरुध्द कलम ४२०, ४६८, ४७१, २७६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सपोनि पोटभरे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गाढवे मो. नं. ८८०५४०५१०७ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा उमरी जामळा पानी शिवार येथे दिनांक ३१/०१/२०२४ चे २०.०० वा. दरम्यान ते दिनांक ०१/०२/२०२४ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नामदेव वसंतरावजी धांदे, वय ३७ वर्ष, रा. हनुमान घाट खापा हा दिनांक ०१/०२/२०२४ चे रोजी सकाळी ०८/०० वा. दरम्यान नेहमी प्रमाणे त्याचे शेतात गेले असता शेतातील कोठयाचा दरवाजा उघडा दिसला व दरवाज्याची कडी तुटलेली दिसली फिर्यादीने आत जावुन पाहीले असता कोठयातील ठेवलेला ०४ क्वींटल कापुस किंमती २४,०००/—रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार खोमेश्वर बांबल, पास्टे खापा हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**